advt17


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER
कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३२३/ दि. जानेवारी,२०२३

## कृषी विद्यापीठांतर्गत आचार्य पदवी प्रवेश सूचना २०२२-२३

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरिता खाली नमूद केलेल्या आचार्य पदवी अभ्यासक्रमास प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांकडून प्रवेश माहिती पुस्तिका २०२२-२३ मधील सूचनेनुसार ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे. अभ्यासक्रमाचे माध्यम इंग्रजी राहील.

१. उपलब्ध विद्याशाखा

| अ.क्र. | अभ्यासक्रम | अ.क्र. | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| (१) | पीएच.डी. (कृषी) | (२) | पीएच.डी. (मत्स्यविज्ञान) |
| (३) | पीएच.डी. (अन्न तंत्रज्ञान) | (४) | पीएच.डी. (कृषी जैव तंत्रज्ञान) |
| (५) | पीएच.डी. (कृषी अभियांत्रिकी) | | |

२. प्रवेश पात्रता, महाविद्यालय, प्रवेश क्षमता, आरक्षण, प्रवेश कार्यपध्दती इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची आचार्य पदवी प्रवेश माहिती पुस्तिका व ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याची सुविधा दि. १६ जानेवारी,२०२३ पासून **www.mcaer.org** व **https://maha.agriadmissions.in** या संकेतस्थळांवर उपलब्ध असेल. प्रवेशोच्छुकांनी सदर संकेतस्थळावरून प्रवेश माहिती पुस्तिका प्राप्त करून घ्यावी. प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे आहे.

advt17

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-**

- उमेदवारांने **https://maha.agriadmissions.in** या संकेतस्थळाद्वारे **दि. ३१ जानेवारी,२०२३ पर्यंत** ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. यानंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध नसेल.
- 'ऑन लाईन' भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, आवश्यक ती संबंधित स्वयंसाक्षांकित कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.
- **प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत.**
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड किंवा नेट बँकीगद्वारे भरावे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क-**

खुल्या प्रवर्गासाठी रु. २०००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. १०००/- (दिव्यांग, अनाथ) आणि (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*., आर्थिक दुर्बल घटक)
[आर्थिक दुर्बल घटक वगळता जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य. तसेच *उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.]

पात्र असलेल्या प्रवेशोच्छुक उमेदवारांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी उक्त संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेचे आकलन करून विहित वेळेत ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करावेत.

क्र. मकृप/शिक्षण-१/३२३/ १०१
दिनांक- १२ जानेवारी,२०२३

(रावसाहेब भागडे)
**महासंचालक**
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे